# महाराष्ट्र विधानसभा

## तिसरे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**पालघर जिल्ह्यातील रिक्त पदे भरुन विविध शासकिय कार्यालयासाठी जागा देण्याबाबत**

**(१) १८४९ (२२-१२-२०१४). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १ ऑगस्ट, २०१४ पासून अस्तित्वात आलेल्या नीवन पालघर जिल्ह्यातील, जिल्हाधिकारी कार्यालय व अन्य कार्यालयासाठी पुरेशी कार्यालयीन जागा उपलब्ध नसल्यामुळे अधिकारी व कर्मचारी यांना अपु-या जागेत काम करावे लागत असून अभ्यांगतांना अनेक गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवीन निर्माण झालेल्या पालघर जिल्ह्यातील विविध शासकिय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करुन देऊन अद्ययावत शासकीय संकुल उभारण्याबाबत व लवकरात लवकर कार्यान्वित करण्याबाबत तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७) :**(१), (२) व (३) शासनाने शासकीय जमिनीवर नवनिर्मित पालघर जिल्ह्याचे मुख्यालय व पालघर नवनगर सिडको लि. यांच्यामार्फत विकसित करण्यास दि. २९/०६/२०१६ च्या शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. सुमारे १०३-५७.९० हे.आर एवढ्या शासकीय जमिनीवर प्रथम जिल्हा मुख्यालय विकसित करुन त्यावर विविध विभागांच्या जिल्हास्तरीय कार्यालयांसाठी शासकीय इमारतींचे बांधकाम आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करुन घ्याव्यात, असे आदेश देण्यात आले आहेत.

जिल्हाधिकारी, पालघर यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय कार्यालय प्रमुखांची अधिकारी/कर्मचारी नियुक्तीबाबत वेळोवेळी आढावा बैठका घेण्यात येवून अधिकारी/कर्मचारी यांची रिक्त पदे बदलीने/नवीन नियुक्तीने भरण्याबाबत संबंधित कार्यालयांनी कार्यवाही सुरु केलेली आहे.

---

**सिंदेवाही (जि.चंद्रपूर) येथील तहसिल कार्यालयाच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणेबाबत**

**(२) ५४८५ (०४-०४-२०१५). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील सिदेवाही येथे सन १९८१ मध्ये बांधलेल्या इमारतीमध्ये तहसिल कार्यालयाचे प्रशासकीय कामकाज सुरु असून सदर इमारत नादुरुस्त झाल्यामुळे नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक आहे सदर इमारत बांधकाम करण्यासाठी शासनाने निधीसह मंजूरी द्यावी अशी मागणी नागरिकांसह लाकप्रतिनिधींनी निवेदनाद्वारे मा.महसूल मंत्री, प्रधान सचिव, महसूल विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक २८ जानेवारी, २०१५ च्या सुमारास केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सिंदेवाही येथील तहसिल कार्यालयाच्या नविन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्यासाठी राज्य शासनाने कोणती कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७) :**(१) होय. यासंदर्भात दि.२०/०१/२०१५ रोजीचे लोकप्रतिनिधींचे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.

(२) व (३) अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर यांनी सिंदेवाही येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याकरीता अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सादर केले आहेत. सदर अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

---

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इंदिरा गांधी आवास योजनांचे काम करण्यास लेखा अधिकाऱ्यांनी नकार दिल्याबाबत**

**(३) ३३२९२ (२२-०१-२०१६). श्री. दत्तात्रय भरणे (इंदापूर), डॉ. सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री. नितेश राणे (कणकवली), श्री. पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री. किसन कथोरे (मुरबाड), श्री. जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री. सुरेश लाड (कर्जत), श्री. दिपक चव्हाण (फलटण), श्री. राजेश टोपे (घनसावंगी) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना व इंदिरा गांधी आवास योजनेच्या कामासाठी नियुक्त केलेल्या ३५० पंचायत समित्यामधील १४०० लेखा अधिकाऱ्यांनी उक्त योजनाचे काम करण्यास नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय तसेच चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) तसेच प्रकरणी उक्त योजनेची कामे करण्यास लेखाधिकाऱ्यांनी नकार देण्याची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७) :** (१) अंशत: खरे आहे.

काही जिल्हयातील लेखा अधिकाऱ्यांनी मगांराग्रारोहयो व इंदिरा गांधी आवास योजनेचे काम करण्यास नकार दिला होता.

(२) व (३) या संदर्भात दिनांक १०.०८.२०१५ रोजी प्रधान सचिव (ग्रामविकास) यांचेकडे जिल्हा परिषद लेखा कर्मचारी संघटनेशी चर्चा झाली. त्यामध्ये पंचायत समिती मार्फत अनेक केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत असल्याने, कामाचा बोजा मोठया प्रमाणावर पडत असल्याची बाब निदर्शनास आणण्यात आली. सदरचे आंदोलन संपुष्टात आले आहे.

---

## ऑनलाईन सात-बारा उतारे प्राप्त करण्याच्या प्रक्रियेबाबत

**(४) ३६५७५ (२३-१२-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राजन साळवी (राजापूर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सात-बारा व इतर जमिनी विषयक उतारे ऑनलाईन करण्याची कार्यवाही सुरू केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्सास सदर ऑनलाईन प्रक्रियेसाठी ग्रामीण भागातील सर्वच तलाठी कार्यालयांमध्ये ब्रॉडबँड सुविधा नसल्यामुळे इंटरनेट अभावी सदरचे उतारे वाटप करण्यात अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागरिकांना वेळेत उतारे मिळत नसल्यामुळे जमिनींची खरेदी-विक्री, शासकीय मदतीचे वाटप व अन्य कामांसाठी विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास सदर प्रक्रियेत सुधारणा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करणेत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७) :**(१), (२), (३) व (४) ई-फेरफार तथा ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम सुरु करण्याचा निर्णय राज्य शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला असून त्यानुसार, राज्यातील नागरीकांना ई-फेरफार कार्यक्रमांतर्गत संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

ई-फेरफार आज्ञावलीची अंमलबजावणी संपूर्ण राज्यात सुरू करण्यात आली आहे. सदर आज्ञावली राबविताना येत असलेल्या अडचणींचे निराकरण करण्यासाठी “एडिट मोड्युल” ही प्रणाली विकसित करण्यात आली असून तिचा वापर राज्यात सुरू आहे. सदर प्रणालीचा वापर करण्यासाठी तालुकास्तरावर व ग्रामिण भागात येणारी कनेक्टिव्हीटीची अडचण विचारात घेऊन राज्यात मंडळ स्तरावर उच्च क्षमतेच्या कनेक्टिव्हीटीयुक्त एकूण १६८३ वर्कस्टेशन्स स्थापन करण्यात आली असून त्याव्दारे ई-फेरफार प्रणाली राबविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

तसेच ज्या ठिकाणी कनेक्टिव्हीटी उपलब्ध होत नाही, त्याठिकाणी सॅटेलाईट कनेक्टिव्हीटी देण्याबाबतचा विचार सुरू असून माहिती तंत्रज्ञान विभागाने आवश्यकतेप्रमाणे वेब सर्व्हर व डाटा सर्व्हर उपलब्ध करून दिलेले आहेत.

ई-फेरफार प्रणालीच्या अंमलबजावणीत काही अडचणी आल्यास त्या तात्काळ दूर करण्याच्या दृष्टीने जमाबंदी आयुक्त आणि संचालक भूमि अभिलेख, पुणे कार्यालयात प्रत्येक विभागासाठी स्वतंत्र ई-फेरफार मदत कक्ष कार्यरत आहे.

ऑनलाईन गा.न.नं. ७/१२ वितरणातील अडचणी लक्षात घेवून जेथे तांत्रिक कारणास्तव ई-फेरफार प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उतारे वितरित करणे शक्य नाही, त्या ठिकाणी गा.न.नं. ७/१२ ची तातडी विचारात घेवून हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ वितरित करण्यासाठी ३०.०४.२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक तालुक्यातील अनेक गावांत सन १९६८ नंतर भूमी अभिलेख विभागाकडून सिटी सर्व्हे केला नसल्याबाबत

**(५) ३७२१७ (२९-०४-२०१६). डॉ.राहूल आहेर (चांदवड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक तालुक्यातील अनेक गावांत सन १९६८ नंतर भूमी अभिलेख विभागाकडून सिटीसर्व्हे केला नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मूळ वाहिवाटवार रहिवासी असून ते रितसर ग्रामपालिकेला कर भरतात अशा अनेक ग्रामस्थांच्या घरांची सिटी सर्व्हे नोंद नसल्याने नागरिकांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नाशिक तालुक्यातील गावांमध्ये सिटी सर्व्हे व्हावा अशी मागणी नागरिकांना केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नाशिक तालुक्यातील सर्व गावांमध्ये सिटी सर्व्हे करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१७-०५-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, नाशिक यांच्या अधिसूचनेनुसार नाशिक महानगरपालिका विस्तारीत क्षेत्रातील एकूण २५ गावांचे वेळोवेळी सविस्तर मोजणीचे काम हाती घेण्यात आले असून त्यापैकी १८ गांवे परिरक्षणाखाली घेण्यात आलेली आहेत.

नाशिक शहराचे वाढते विस्तारीकरण व औदयौगिकरणामुळे नाशिक महानगरपालिका शहरालगतच्या विस्तारीत क्षेत्रामध्ये समाविष्ट होणारी गावे व त्यांचे क्षेत्र सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी, नाशिक यांनी वेळोवेळी सामिल करुन अधिसूचना पारित केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने गावांची सविस्तर मोजणी होऊन मिळकतीचे नगर भूमापन अभिलेख तयार करण्याची कार्यवाही विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख (न.भू.) क्र. १ व २ कार्यालयाकडून केली जाते. त्याअंतर्गत सविस्तर मोजणीचे काम व त्यानुषंगाने अनुसरण

कामकाज करण्यात येते. त्यानंतर सदर सविस्तर मोजणीचे अनुषंगाने नगर भूमापन अभिलेखाचे हक्क चौकशीचे कामकाज विशेष उप अधीक्षक भूमि अभिलेख तथा चौकशी अधिकारी (श.मा.) क्र. १, २ व ३ यांचे कार्यालयामार्फत केले जाते. त्यांचेकडे असलेले चौकशी बाबतची कार्यवाही करण्याची कार्यपध्दती व जबाबदारी त्यांना नियुक्ती प्राधिकारी यांचेमार्फत नेमून देण्यात आलेली आहे.

---

**खेड शिवापूर (जि.ठाणे) टोलनाक्यावर सवलत करारनाम्यातील तरतुदीनुसार स्थानिक नागरीकांच्या MH-१२ बिगर व्यावसायिक वाहनांना पासेस देण्यात आले नसल्याबाबत**

**(६) ३९६८६ (२९-०४-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहर हद्दीपासून १० ते १५ किमी अंतरावरील खेड शिवापूर टोलनाक्यावर सवलत करारनाम्यातील तरतुदीनुसार स्थानिक नागरीकांच्या MH-१२ बिगर व्यावसायिक वाहनांना पासेस देण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या टोलनाक्यापासून २० कि.मी. त्रिज्येच्या अंतरात राहणाऱ्या नागरिकांना पासेस देण्याचे करारात नमूद असतांनाही पासेस दिले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आत्तापर्यंत २० कि.मी. त्रिज्येच्या अंतरात राहणाऱ्या किती वाहन धारकांना पासेस देण्यात आले, त्याचा सविस्तर तपशील काय आहे,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाकडून काय कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१९-०६-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) हे खरे नाही. पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या मार्फत सुरु आहे. सदर रस्त्यावरील खेड शिवापूर टोलनाका पुणे शहरापासून २५.४० कि.मी. आहे.

भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण आणि कामाचे सवलतकार मे. पी.एस. टोल रोड कंपनी प्रायव्हेट लिमिटेड यांच्यामध्ये झालेल्या सवलतकरारनाम्यातील तरतुदीनुसार टोलनाक्यापासून २० कि.मी. त्रिज्येच्या अंतरात राहणाऱ्या स्थानिक नागरीकांच्या बिगर व्यावसायिक वाहनांना पासेस देण्यात आल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

सन २०१० ते माहे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत एकूण ७०९१ वाहन धारकांना पासेस देण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

---

**नरसी फाटा, (जि. औरंगाबाद) येथील नायगाव तहसील कार्यालयाच्या इमारतीतील बेड कॉंक्रीट विना परवानगी तोडून टाकल्याबाबत**

**(७) ४२८३१ (२९-०४-२०१६). श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नरसी फाटा, जिल्हा औरंगाबाद येथील नायगाव तहसील कार्यालयाच्या इमारतीतील मोकळया जागेत शासनाकडून करण्यात आलेले बेड कॉंक्रीट मजबुत असतांना हे बेड कॉंक्रीट विना परवानगी संबंधित तहसिलदार यांनी मजूर लावून तोडून टाकले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७) :**(१) होय.

(२) नायगांव, जि. नांदेड येथे तहसिल कार्यालय परिसरात बॅडमिंटन खेळण्यासाठी मैदान उपलब्ध नव्हते यास्तव महसूली क्रीडा स्पर्धेच्या अनुषंगाने महसूल कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांना बॅडमिंटन खेळण्यासाठी सिमेंट कॉंक्रीट फोडुन बॅडमिंटन कोर्ट तयार करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**महसूल विभागातील तलाठयांना लॅपटॉप देण्याच्या घेतलेल्या निर्णयाबाबत**

**(८) ५३७२६ (१९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.पतंगराव कदम (पलूस कडेगाव), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.राजाभाऊ (पराग) वाजे (सिन्नर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल विभागातील सर्वात महत्वाचा घटक असलेल्या तलाठयांना तांत्रिकदृष्टया सक्षम करण्यासाठी, तलाठयाचे काम गतीने व बिनचुक व्हावे यासाठी लॅपटॉप दिले असून कालबाहय सॉफ्टवेअरसह नेट सेंटरचे बिल थकल्याने तलाठयांचे काम बंद पडले असून, त्यांना अनेक

महिन्यांपासून, ऑफलाईन काम करावे लागत असल्याचे, माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तांत्रिक कामात शासनाकडून अपेक्षित सहकार्य मिळत नसल्यामुळे, दिनांक ०४ एप्रिल, २०१६ रोजी पासून राज्य तलाठी संघाने राजव्यापी आंदोलन करुन ऑनलाईन कामकाजावर बहिष्कार टाकला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यात तलाठयांचे कामकाज ऑनलाईन सुरु करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाय योजना करण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) तसेच यासाठी राज्य शासनाने किती रुपायाचा निधी उपलब्ध करुन दिला आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन “ई-फेरफार” प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला असून त्याअनुषंगाने “ई-फेरफार” आज्ञावलीच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील १२६३७ तलाठी व २१०६ मंडळ अधिकारी यांना महसूल व वन विभाग शासन निर्णय दि.०१.०१.२०१३ अन्वये डेटा कार्ड खरेदीसाठी एकवेळची रक्कम रुपये १४५०/- अदा करण्यात आली आहे व डेटा कार्ड वापरासाठीचे दरमहा प्रतिपूर्ती शुल्क रुपये ७५०/- याप्रमाणे सन २०१२-२०१३ पासून सन २०१५-२०१६ पर्यंत रक्कम तलाठी व मंडळ अधिकारी यांना वाटप करण्यात आलेली आहे.

तसेच जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह ई-फेरफार वर्कस्टेशन्स स्थापन करण्यात आली आहेत. ज्या मंडळस्तरावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही तेथे सॅटेलाईटव्दारे कनेक्टीव्हीटी पुरविण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत.

जेथे संबंधित कर्मचाऱ्यांकडे आवश्यक ते हार्डवेअर (लॅपटॉप / प्रिंटर्स ) उपलब्ध नाही अथवा पुरविण्यात आलेले हार्डवेअर कालबाहय झाले आहे अशा प्रकरणी ते संबंधितांना पुरविण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे. तलाठ्यांना संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्रीच्या व डाटा कन्व्हर्जनच्या काही ठिकाणी आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याकरीता “एडीट मोड्युल” ची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली असून सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना एडिट मॉड्यूलचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

तसेच संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ वितरीत करण्यात काही ठिकाणी अद्यापही येत असलेल्या अडचणी विचारात घेता, “एडीट मोड्यूल” च्या माध्यमातून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या होईपर्यंत तसेच, जेथे तांत्रिक कारणांस्तव “ई-फेरफार” प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ च्या उताऱ्यांचे प्रिंट आऊट काढून अर्जदारांस वितरीत करणे शक्य होत नसेल तेथे, आता एक विशेष बाब म्हणून, केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज

व अन्य शेती विषयक प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यास दि. ३०.०४.२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली आहे.

"ई-फेरफार" प्रणाली राबविण्यासंदर्भातील सर्व अडचणींवर मात करुन तीच्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासन प्रयत्नशिल आहे.

---

**गंगाझरी, टिकायातपूर, रतनारा,गोंदीया (जि.गोंदिया) इत्यादी गावातील बिगर आदिवासी यांनी फसवणूक करुन, बेकायदा ताब्यात घेतलेल्या जमीनी हस्तांतरीत करण्याबाबत**

**(९) ५४४१७ (१९-०८-२०१६). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाझरी, टिकायातपूर, रतनारा, गोंदीया (जि.गोंदिया) इत्यादी गावातील बिगर आदिवासी यांनी फसवणूक करुन, बेकायदा ताब्यात घेतलेली ४१ प्रकरणातील १६०५ एकर जमिन शासनाने मूळ आदिवासींना सन १९७५ पासून ते अद्यापपर्यंत ताब्यात दिली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने महाराष्ट्र जमिन महसूल संहिता १९६६ मधील कलम, ३६, ३६-अ तसेच महाराष्ट्र अनुसूचित जमातींना जमिन प्रत्यार्पित करण्यासाठी अधिनियम, १९७४ व १९७५ अन्वये, सदरहू जमिनी मुळ आदिवासींना विनाविलंब हंस्तातरीत करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७)** :(१) (२) (३) व (४) गंगाझरी, टिकायतपूर, रतनारा, गोंदिया या ता. जि. गोंदिया गावातील बिगर आदिवासींस झालेल्या जमिनीच्या हस्तांतरणाबाबत एकुण ४८ प्रकरणे तहसिलदार गोंदिया कार्यालयात नोंदविण्यात आलेली असून, सदर प्रकरणांबाबत त्यांनी उभयपक्षांना नोटीस पाठवून सुनावणी घेतली आहे. सदर प्रकरणी आवश्यक ती चौकशी केल्यानंतर ४२ प्रकरणात उक्त जमिनी आदिवासीधारकांस प्रत्यार्पित करण्याबाबत तहसिलदार, गोंदिया यांनी आदेश पारित केले आहेत.

वरील ४२ प्रकरणांपैकी १० प्रकरणात संबधित आदिवासीधारकांस जमिनीचा ताबा देण्याची कार्यवाही झालेली आहे, २४ प्रकरणात जमिनीचा ताबा देण्याची कार्यवाही सुरु आहे व ८ प्रकरणांत वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल करण्यात आलेले आहे.

उर्वरित ६ प्रकरणाबाबत तहसिलदार, गोंदिया यांच्या कार्यालयात चौकशी सुरु आहे.

---

**राज्यातील सातबारा व ८-अ उतारे ऑनलाईन पध्दतीने देण्याच्या योजनेत अनेक उतारे सदोष व चुकीच्या पध्दतीने वितरीत झाल्याबाबत**

**(१०) ५५६२६ (१९-०८-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सातबारा व ८-अ उतारे ऑनलाईन पध्दतीने देण्याच्या योजनेत अनेक उतारे सदोष व चुकीच्या पध्दतीने वितरीत झाल्याची तसेच सर्व्हर बंद पडल्यामुळे नोंदी बंद करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ रोजी व त्या त्यादरम्यान कोल्हापुर जिल्हयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ई-म्युटेशन पध्दतीमुळे नोंदणी कार्यालयात नोंदणी पुर्ण होण्याकरिता सध्या अस्तित्वात असलेले खाते उतारे गाव कामगार तलाठी यांनी चुकीच्या पध्दतीने भरल्यामुळे हस्त लिखीत उतारे व ऑनलाईन उतारे यामध्ये तफावत आढळून आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ई-म्युटेशन पध्दतीस स्थगिती देवून पुर्वीचीच नोंदणी पध्दत सुरू ठेवण्याची मागणी हातकणंगले तालुक्यातील वकील व मुद्रांक विक्रेते यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ईम्युटेशन पध्दतीस स्थगिती देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७)** :(१), (२), (३), (४), (५) व (६) अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन "ई-फेरफार" प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला आहे.

तालुका जिवती जि.चंद्रपूर वगळता राज्यात उर्वरीत ३५७ तालुक्यांत "ई-फेरफार" कार्यक्रमाची अंमलबजावणी सुरु आहे. संगणकीकृत गा.न.नं.७/१२ मधील डाटा एन्ट्रीच्या व डाटा कन्व्हर्जनच्या काही ठिकाणी आढळणाऱ्या चुका दुरुस्त करुन त्यातील नोंदी हस्तलिखित गा.न.नं.७/१२ शी जुळविण्याकरीता "एडीट मोड्युल" ची सुविधा तलाठयांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कोल्हापूर जिल्हयातील एकूण सर्व १२ तालुक्यांमध्ये हस्तलिखित गा.न.नं.७/१२ व संगणकीकृत गा.न.नं.७/१२ यामध्ये तफावत आढळल्यास, तलाठी "एडीट मोड्युल" ची सुविधा वापरुन आवश्यक त्या दुरुस्त्या करुन गा.न.नं.७/१२ व ८-अ उतारे वितरीत करीत आहेत.

सर्व तलाठी व मंडळ अधिकारी यांना एडिट मॉड्यूलचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. तसेच जिल्हास्तरावर निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी (तांत्रिक मार्गदर्शन) यांच्या सहभागाने हेल्प डेस्क स्थापन करण्यात आले असून त्यांच्याकडून तांत्रिक अडचणीच्या निवारणार्थ मार्गदर्शन करण्यात येते.

ई-फेरफार कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी उपलब्ध सर्व्हरची क्षमता अपुरी पडत असल्याने राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्या सल्ल्यानुसार माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत मे-२०१६ मध्ये स्टेट डेटा सेंटर, मुंबई येथे नविन हार्डवेअर स्थापित करण्यात आले असून स्टेट डेटा सेंटर मधील तीनही सर्व्हरचा RAM वाढविण्याची कार्यवाही माहिती

तंत्रज्ञान विभागाने केलेली आहे. या उपरान्त सर्व्हर विषयक येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी प्रत्येक महसूल विभागासाठी स्वतंत्र डाटा बेस सर्व्हर व प्रत्येक जिल्ह्याकरीता स्वतंत्र वेब सर्व्हर ऑक्टोबर, २०१६ मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. जेथे कनेक्टीव्हीटी विषयक समस्या आहेत अशा भागात मंडळ स्तरावर हायस्पीड ब्रॉडबॅन्ड कनेक्टीव्हीटीसह "ई-फेरफार" वर्कस्टेशन्स स्थापन करण्यात आली आहेत. ज्या मंडळस्तरावर इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही तेथे सॅटेलाईटव्दारे कनेक्टीव्हीटी पुरविण्याकरीता प्रयत्न करण्यात येत आहेत. जेथे संबंधित कर्मचाऱ्यांकडे आवश्यक ते हार्डवेअर (लॅपटॉप / प्रिंटर्स) उपलब्ध नाही अथवा पुरविण्यात आलेले हार्डवेअर कालबाह्य झाले आहे अशा प्रकरणी ते संबंधितांना पुरविण्याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले असून त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही सुरु आहे.

तसेच जेथे तांत्रिक कारणांस्तव "ई-फेरफार" प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं.७/१२ च्या उताऱ्यांचे प्रिंट आऊट काढून अर्जदारांस वितरीत करणे शक्य होत नसेल तेथे, आता एक विशेष बाब म्हणून, केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेती विषयक प्रयोजनाकरीता तेसच थेट शासनासोबत जमिन विक्री व्यवहार करण्याच्या प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न.नं.७/१२ उतारे वितरीत करण्यास दि.३०.०४.२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली आहे.

ई-म्यूटेशन पध्दतीस स्थगिती देवून पूर्वीची पध्दत सुरु ठेवण्यासंदर्भात ॲड. आनंद पटवा यांची दि.१७.०३.२०१६ ची नोटीस जमाबंदी आयुक्त, पुणे कार्यालयास प्राप्त झाली होती. त्यांना तहसिल कार्यालय हातकणंगले यांचेकडून दि.१६.०९.२०१६ रोजी यथोचित उत्तर देण्यात आले आहे.

"ई-फेरफार" प्रणाली राबविण्यासंदर्भातील सर्व अडचणींवर मात करुन तीच्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासन प्रयत्नशिल असून या योजनेचा अंमलबजावणीस स्थगिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### मिरा भाईंदर महापालिका नव्या मुख्यालयाच्या वादग्रस्त भूखंडाबाबत

**(११) ५६१२५ (१९-०८-२०१६). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा-भाईंदर महापालिका नव्या मुख्यालयाच्या वादग्रस्त भूखंडाच्या चौकशीचे आदेश देऊन बांधकामास जिल्हाधिकारी यांनी स्थगिती दिल्याची बाब माहे एप्रिल, २०१६ च्या पहिल्याच आठवडयात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक २६ एप्रिल, २०१६ रोजी उक्त वादग्रस्त भूखंडाची चौकशी थांबविण्याचे आदेश कोकण विभागीय आयुक्तांनी दिले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने यापकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७) :**(१) जिल्हाधिकारी, ठाणे यांना प्राप्त झालेल्या एका तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, ठाणे यांच्या दि.२८.१०.२०१५ व उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्या दि. १७.१२.२०१५ च्या अहवालावरुन मौजे भाईंदर येथील जुना सर्व्हे क्र. ४७८ पै (नवीन सर्व्हे क्र. ११४पै) व ४८१ पै (नवीन सर्व्हे क्र. ११३ पै) या जमिनी शासकीय असल्याचे जिल्हाधिकारी, ठाणे यांच्या निदर्शनास आल्याने जिल्हाधिकारी, ठाणे यांनी त्यांच्या दि. १८.१२.२०१५ च्या पत्रान्वये आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना शासनाच्या हितसंबंधाबाबत निर्णय होईपर्यंत सदर जमिनीवरील बांधकाम परवानगी स्थगित करण्यात यावी, असे कळविले आहे.

(२), (३), (४) व (५) फेरफार क्रमांक ९११, दि. १५.०१.१९५३ नुसार मौजे भाईंदर, ता.जि.ठाणे येथील सदर जुना स.नं. ४९८ व ४८१ या जमिनी दि सालसेट इस्टेट (लँड रेव्हेन्यू एक्झम्शन ॲबोलिशन) ॲट १९५१ च्या कलम ४ नुसार सरकारी बिन आकारी पडीत म्हणून दाखल करणेबाबत नोंद करण्यात आली.

तद्नंतर सदर जमिनीच्या खाजगी व्यक्तींच्या लाभात नोंदी झालेल्या असल्याने जमिनीच्या हस्तांतरणाबाबत उप विभागीय अधिकारी, ठाणे यांनी यासंदर्भात सुनावणीची कार्यवाही सुरू केली होती. सदर कार्यवाहीविरुध्द मे. आर.एन.ए कॉर्पोरेशन प्रा.लि. यांनी विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता कलम २५७ अन्वये पुनरीक्षण अर्ज दाखल केला होता. सदर पुनरीक्षण अर्जाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, कोकण यांनी दि. २६/४/२०१६ रोजी आदेश पारीत करुन उप विभागीय अधिकारी, ठाणे यांच्याकडील पुनरीक्षणाची कार्यवाही रद्द केली.

मौजे भाईंदर, ता.जि.ठाणे येथील सदर मिळकतीबाबतचे फेरफार क्र. ४६१६ व ५११२ पुनरीक्षणात घेण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, ठाणे व विभागीय आयुक्त, कोकण यांच्याकडून प्राप्त झाले असून सदर प्रस्ताव शासन स्तरावर विचाराधीन आहे.

---

## राज्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांनी केलेले आंदोलन

**(१२) ५७६३२ (१९-०८-२०१६). श्री.संजय केळकर (ठाणे), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची अपूर्ण संख्या तसेच तांत्रिक दर्जासह वेतन श्रेणी तयार करण्यासाठी राज्यातील विविध जिल्ह्यातील कर्मचाऱ्यांनी सन २०१५ मध्ये बेमूदत बंद आंदोलन करूनही त्यांच्या मागण्या पूर्ण करण्यात आल्या नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील हजारो कर्मचाऱ्यांवर अन्याय होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये असंतोष निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांनी केलेल्या मागण्या पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे व त्याचे स्वरुप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) राज्य भूमी अभिलेख कर्मचारी संघटनेच्या कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी पुणे विभागात दि.१६.०१.२०१५ ते ०९.०२.२०१५ या कालावधीत तर मुंबई, नाशिक व औरंगाबाद विभागात दि.२७.०१.२०१५ ते ०७.०२.२०१५ या कालावधीत काम बंद आंदोलन केले होते.

जमाबंदी आयुक्त, पुणे यांनी भूमि अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांच्या संवर्गांना तांत्रिक दर्जा देऊन त्याप्रमाणे वेतनश्रेणी देण्याच्या कर्मचाऱ्यांच्या मागणीसंदर्भात शासनास प्रस्ताव सादर केला आहे. मात्र भूमि अभिलेख विभागातील काही संवर्ग वगळता, अन्य संवर्गातील पदभरतीच्या नियमांत विशिष्ट तांत्रिक अर्हता धारण करण्याची पूर्वशर्त नाही. सेवाप्रवेशानंतर काही संवर्गांना भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी, औरंगाबाद येथे प्रशिक्षण देण्यात येत असले तरी ते अल्पकालावधीचे असून त्याचे सक्षम प्राधिकरणाकडून प्रमाणिकरण झालेले नाही. या पार्श्वभूमिवर भूमि अभिलेख विभागास सरसकट तांत्रिक विभाग म्हणून मान्यता देणे शक्य होत नाही.

---

**राज्यातील कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रने (आत्मा) मध्ये ८५४ पदे रिक्त असल्याबाबत**

**(१३) ५८३९६ (२०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील शेतक-यांच्या समस्या जाणून घेऊन त्यांची सोडवणूक करणे आणि त्यांची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मध्ये तब्बल ८५४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) तसेच कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मध्ये पूर्ण वेळ संचालकही नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ही रिक्त पदे तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (१२-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे. आत्मा योजने अंतर्गत एकुण १५८२ पदांपैकी ८८७ पदे दि. ३० जुन २०१६ अखेर रिक्त आहेत.
(२) होय हे खरे आहे. अतिरिक्त पदभार देण्यात आला आहे.

(३) आत्मा यंत्रणेतील रिक्त पदे भरण्याऐवजी या विभागाच्या शासन निर्णय दि.२३.३.२०१७ अनुसार खरीप २०१७ पासून कृषि सहाय्यक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान अंतर्गत समाविष्ट पिकांसाठी प्रत्येकी एक प्रात्यक्षिक समूह आयोजित करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच गटशेती योजनेंअतर्गतही ४० ते ५० हेक्टर समुहावर आधुनिक शेतीला प्रोत्साहन देण्याचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. अशाअसमुहाकरिता कृषि तंत्रज्ञानाच्या विस्ताराकरिता आवश्यकतेनुरुप कृषि तज्ञ, प्रगतीशील शेतकरी व पिकनिहाय उत्तम माहिती असणाऱ्या बेरोजगार कृषि पदवीधर यांची सेवा कृषि मार्गदर्शक व तंत्रज्ञान व्यवस्थापक म्हणून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. यानुसार कृषि विस्ताराकरिता निवडक गटांसोबत कार्य करणा-या कृषि मार्गदर्शक व तंत्रज्ञान व्यवस्थापकांना आत्मा योजनेअंतर्गत कृषिक समुहामार्फ़त त्या हंगामाच्या कालावधीकरीता विहित मापदंडाप्रमाणे मानधन देण्यात येणार आहे. हंगामाच्या शेवटी पिकाच्या किमान हमी दराप्रमाणे परिगणित प्रतिहेक्टरी उत्पन्न जास्त असल्यास अशा कृषि मार्गदर्शक व तंत्रज्ञ यांची सेवा पुढील हंगामासाठी अग्रक्रमाने उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली-कोल्हापूर मार्गाच्या चौपदरीकरणांतर्गत जयसिंगपूर शहरातून दुपदरी आणि तमदलगे बायपास मार्ग दुपदरी करण्याबाबत तसेच हेरवाडे कॉलनीपासून पायोस हॉस्पिटलपर्यंत पिलरवरील उड्डाणपूलाच्या मागणीबाबत**

**(१४) ५९३३२ (२४-०८-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली-कोल्हापूर चौपदरीकरणांतर्गत जयसिंगपूर शहरातून आणि तमदलगे बायपास मार्ग दुपदरी करण्याची तसेच हेरवाडे कॉलनीपासून पायोस हॉस्पिटलपर्यंत पिलरवरील उड्डाणपूलाची आवश्यकता आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर उड्डाणपूलाचा प्रस्ताव बांधकाम विभागाच्या विचाराधीन आहे काय,
(३) तसेच हातकणंगले-तमदलगे खिंडी येथे (जि.कोल्हापूर) दोन्ही मार्ग एकत्र येत असल्यामुळे जयसिंगपूर मार्गे जाणा-या वाहनांची संख्या मोठया प्रमाणात असल्याने तसेच बायपास मार्गाचाही अनेक प्रवासी अवलंब करीत असल्यामुळे या एकत्र येणा-या मार्गावर कोणत्याही प्रकारचा दिशादर्शक फलक नसल्यामुळे बसवान खिंड अपघाताचे केंद्र बनत चालले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे वा करित आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१७) :**(१) अंशत: खरे आहे.
(२) नाही.

सदरचा उड्डाणपूल रद्द करणेबाबतचा ठराव जयसिंगपूर नगरपरिषद यांनी दि.०२.०६.२०१२ अन्वये मंजूर केला असलेने सदरचा उड्डाणपूल रद्द करणेबाबतचा प्रस्ताव वाव बदल प्रस्तावासह मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीपुढे सादर करण्याची कार्यवाही शासन स्तरावरून करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

तमदलगे खिंड येथे दिशादर्शक फलक (वळण रस्ता फलक, काम चालू फलक व जंक्शन फलक इ.) लावलेले असून जंक्शन जवळ झेब्रा पट्टे मारणेत आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**भुमि अभिलेख (ता.वरुड, जि.अमरावती) कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांनी जमिनीची मोजणी करण्यासाठी पैशाची मागणी केल्या असल्याबाबत**

**(१५) ५९६२८ (२४-०८-२०१६). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती जिल्ह्यातील वरुड येथील भुमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी हे शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोजमाप करण्यासाठी शेतकऱ्यांकडून हजारो रुपयाची मागणी करीत असल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केलीआहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याअनुषंगाने पैशाची मागणी करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७)** :(१) असे निदर्शनास आले नाही.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वैतरणा रेल्वे स्थानकापासून पालघर रेल्वे स्थानकापर्यंतचा रस्ता विकसित करण्याबाबत**

**(१६) ५९८५० (२६-०८-२०१६). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार उपप्रदेशातील प्रस्तावित वैतरणा रेल्वे स्थानकापासून पालघर रेल्वे स्थानकापर्यंत रेल्वेला समांतर रस्ता विकसित करण्याची मागणी दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत मागणीतील प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१५-०६-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) विषयांकित रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**विरार पूर्व (जि.पालघर) येथील ८० वर्ष जुनी असलेल्या तलाठी कार्यालयाची इमारत मोडकळीस आल्याबाबत**

**(१७) ५९९९१ (१९-०८-२०१६). श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विरार पूर्व (जि.पालघर) मनेवलपाडा रस्त्यावरील ८० वर्ष जुनी असलेली तलाठी कार्यालयाची कौलारु इमारत मोडकळीस आल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पालघर जिल्ह्यातील बहुतेक तलाठी कार्यालये ही स्वतंत्र इमारतींमध्ये सुरू होऊनही उपरोक्त तलाठी कार्यालय स्वतंत्र इमारतीमध्ये सुरू न होण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, प्रश्न भाग १ मधील इमारतीच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणता निर्णय घेतला आहे तसेच पावसाळ्यात या तलाठी कार्यालयास पर्यायी योग्य ती जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती उपाययोजना करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७)** :(१) होय.
(२) विरार पूर्व, मनवेलपाडा येथील तलाठी कार्यालयाकरीता नवीन इमारत बांधकाम करण्यासाठीचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत तयार करुन घेण्यात आले असून सदर अंदाजपत्रके मंजुरीसाठी शासनास सादर करण्याबाबतची कार्यवाही जिल्हाधिकारी, पालघर करीत आहेत.
(३) सदर तलाठी कार्यालयाची आवश्यक ती डागडुजी करण्यात आली आहे. अन्य दुरुस्ती करण्यासाठी तहसिलदार, वसई कार्यालयामार्फत उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, वसई, उप विभाग, वसई यांना कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत इतरत्र जागा उपलब्ध झाली नसल्याने सदर तलाठी कार्यालय स्थलांतरीत करण्यात आलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राजूरा (चि.चंद्रपूर) तालुक्यातील रस्त्यांची झालेली दुरवस्था**

**(१८) ६२५४६ (२४-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राजूरा (चि.चंद्रपूर) तालुका मागासलेला व आदिवासी बहुल असून येथील रस्त्यांची अत्यंत दुरवस्था झाली असल्याने या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण वाढल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या रस्त्यांची दुरुस्ती करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, या रस्त्यांची दुरुस्ती केव्हापर्यंत करण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७)** :(१) अंशतः खरे आहे.

पावसामुळे रस्त्यावर काही प्रमाणात खड्डे पडलेले आहेत. या रस्त्यावरील झालेले अपघात वाहन चालकाच्या दोषामुळे झाल्याचे पोलीस अहवालात नमूद आहे.

(२) सद्यःस्थितीत पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे मुरूम व खडीने भरून रस्ते वाहतुकीस योग्य ठेवण्यात आले आहे. पावसाळ्यानंतर डांबरमिश्रीत खडीने खड्डे भरण्याचे नियोजन आहे. शासनाच्या विविध योजनामधून मंजूर २४ कामापैकी ३ कामे पूर्ण व १२ कामे प्रगतीत, ९ कामे निविदास्तरावर आहेत कामे उपलब्ध निधीप्रमाणे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) सद्यःस्थितीत पावसाळ्यात रस्त्यावरील खड्डे, खडी व मुरूमाने भरून रस्ता वाहतुकीस सूरळीत ठेवण्यात आला असून डांबर मिश्रीत खडीने खड्डे भरण्यात येत आहेत.

---

**पोंभुर्णा (जि.चंद्रपुर) तहसिल कार्यालयात आवश्यक सोयी-सुविधा नसल्याबाबत**

**(१९) ६२७०९ (१९-०८-२०१६). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोंभुर्णा (जि.चंद्रपुर) तालुका निर्मिती होऊन १७-१८ वर्षांचा कालावधी झाला असतानाही येथील तहसिल कार्यालयात आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या कार्यालयास मा.पालकमंत्री यांनी दिनांक ५ मे, २०१६ रोजीच्या सुमारास भेट दिली आहे, हे ही खरेआहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने तहसिल कार्यालयात आवश्यक त्या सुविधा तातडीने देण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७)** :(१) हे खरे नाही.

(२) मा.पालकमंत्री यांनी पोंभुर्णा तालुक्याच्या विकास आराखड्यासंदर्भात दि. ०५/०५/२०१६ रोजी तहसिल कार्यालयास भेट दिली होती.

(३) व (४) पोंभुर्णा तालुक्यातील तहसिल कार्यालयासाठी सन २०११-१२ मध्ये नव्याने इमारत बांधण्यात आली असून सदर इमारतीत आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथील सेतू केंद्रातून विद्यार्थ्यांना दाखले मिळत नसल्याबाबत

**(२०) ६३९६५ (१९-०८-२०१६). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सेतू केंद्रातून दोन महिन्यापासून नागरीकांना मुदत संपुनही दाखले मिळत नसल्याने सकाळपासून सेतू केंद्राबाहेर विद्यार्थी व पालकांची रांग लागत असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उत्पन्नाचा दाखला सेतू केंद्रातून दलाला मार्फत ३ हजार रुपये घेवून दिला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दलालावर कारवाई करुन निर्धारित वेळेत दाखले देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७) :**(१) नाशिक जिल्ह्यात दि. १ एप्रिल, २०१६ पासून सर्व तालुक्यांत महाऑनलाईन पोर्टल च्या माध्यमातून 'महा-ई-सेवा केंद्र' व 'सेतू केंद्रा' मार्फत विद्यार्थ्यांना वेळेत दाखले देण्याची कार्यवाही केली जात आहे. अर्जदार यांनी दाखल केलेल्या जात प्रमाणपत्र किंवा इतर प्रकरणात त्रुटी आढळून आल्यास अशा प्रकरणातदेखील अर्जदार यांचेकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेतली जाते व नागरिक व विद्यार्थ्यांना वेळेत दाखले देण्याबाबत दक्षता घेतली जाते.

तसेच महाराजस्व अभियानांतर्गत जिल्ह्यातील गावोगांवी शिबिरे आयोजित करुन इयत्ता १० व १२ वी च्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्र तसेच इतर आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आलेले आहे.

(२) अशी बाब नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### बावी (जि.सोलापूर) मार्गे बस सेवा सुरु करण्याबाबत

**(२१) ६५५६५ (१६-१२-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बावी (ता.वाशी, जि.उस्मानाबाद) ग्रामपंचायत कार्यालय यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ आगार प्रमुख कळंब, भूम जि.उस्मानाबाद व आगार प्रमुख बार्शी जि.सोलापूर यांना बावी मार्गे बस सोडण्याबाबतचा प्रस्ताव देऊनही कोणतीच कार्यवाही केली नसल्याचे नुकतेच निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बावी मार्गे बस सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०६-२०१७) :**(१) नाही.
(२) ग्रामपंचायत, बावी यांच्या मागणीनुसार बार्शी, आगारामार्फत दिनांक २९.०६.२०१६ पासून बावी मार्गे सकाळी ९.३० व सायंकाळी १६.१५ अशा दैनंदिन २ फेऱ्या सुरु केल्या आहेत.
(३) प्रश्न उदभवत नाही.

---

**राज्य परिवहन महामंडळाने मुंबई सेंट्रल आगार बंद करण्याचा घेतलेला निर्णय**

**(२२) ६५६९२ (१६-१२-२०१६). अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाने मुंबई सेंट्रल आगार बंद करण्याचे ठरविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबई सेंट्रलहून सुटणाऱ्या बस लालबाग आणि परिसरातील कोकणवासीयांसाठी सोयीच्या असून त्या बंद झाल्यास सदर नागरिकांची गैरसोय होणार असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, एसटी बस मधून प्रवास करण्यासाठी प्रवाशांचा प्रतिसाद वाढविण्याकरिता व एसटीच्या विस्तारीकरणासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते (०९-०६-२०१७) :**(१) व (२) मुंबई सेंट्रल आगार बंद करण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही. प्रवाशांची कोणतीही गैरसोय झालेली नाही.
(३) राज्य परिवहन महामंडळाकडे प्रवाशी आकर्षित होण्याकरिता सेवेमध्ये सुधारणा व प्रवाशांना आधुनिक सुविधा देण्यासाठी हिरकणी बसेसच्या आसन सुविधेत बदल करुन त्या पुशबॅक करण्यात आलेल्या आहेत.

तसेच यापुढे साध्या व निमआराम बसेस ऐवजी वातानुकूलित बसेस प्रवाशांना उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. महामंडळाकडून विनावाहक विनाथांबा थेट सेवा सुरु करण्यात आली असून त्यामध्ये राज्य परिवहन महामंडळाच्या एकूण ७७९ फेऱ्या सुरु करण्यात आलेल्या आहेत.

राज्य परिवहन प्रवासी व उत्पन्नात वाढ होण्यासाठी महामंडळाने दि.१ जानेवारी, २०१७ ते ३१ मार्च, २०१७ पर्यंत "प्रवासी वाढवा विशेष अभियान" राबविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गुहागर (जि.रत्नागिरी) किनाऱ्यावर पर्यटकांसाठी उभारण्यात आलेल्या जेटीबाबत**

**(२३) ६५९९३ (०७-०२-२०१७). श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गुहागर (जि.रत्नागिरी) किनाऱ्यावर पर्यटकांना पाण्यात न जाता लाटांचा अनुभव लुटता यावा यासाठी प्रायोगिक तत्वावर जेटी बांधण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदयस्थितीत सदर जेटीची दुरवस्था झाली असून जेटीवर उभारण्यात आलेले सौर पथदिप, संरक्षक रेलिंग बार नादुरूस्त झाल्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जेटीची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७)** :(१) होय.
(२) गुहागर येथे सन २०१४ मध्ये सॉलिड जेट्टी बांधण्यात आली होती. समुद्राच्या उधाणामुळे जेट्टीला समुद्राकडील भागाला तडे गेले आहेत. तसेच समुद्राकडील भागाचे रेलिंग व जेट्टीवरील सौर पथदिपचेही नुकसान झालेले आहे. जेट्टीचे बांधकामासाठी संरक्षण बंधारा बांधणे आवश्यक आहे.
(३) सदर जेट्टीस पुणे येथील सी.डब्ल्यु.पी.आर.एस. संस्थेने सुचविल्याप्रमाणे संरक्षक उपाययोजना करावयाचे काम सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात रु.१००.००लक्ष इतक्या अंदाजित किमतीस मंजूर असून सदर संरक्षक उपाययोजनेचे काम निधीच्या उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गतच्या ठिंबक सिंचन योजनेचे उद्दीष्ट संपल्याने संगणक यंत्रणा बंद केल्याबाबत**

**(२४) ६६४६० (१६-१२-२०१६). श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेंतर्गत शेतकऱ्यांसाठी सुरु करण्यात आलेल्या ठिबक सिंचन योजनेचे उद्दीष्ट संपल्याने शेवटचे दोन दिवस संगणक यंत्रणा बंद करण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यामुळे कोल्हापूर जिल्हयातील एक हजाराहून अधिक शेतकरी या योजनेपासून वंचित राहणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच अनेक वेळा संकेतस्थळाला तांत्रिक अडचणी निर्माण होत असल्याने शेतक-यांना ऑनलाईन फॉर्म भरता आले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत या योजनेस मुदतवाढ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (३१-०३-२०१७)** :(१) नाही. सन २०१६-१७ या वर्षासाठी ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यासाठी दि.७.९.२०१६ ते ६.१०.२०१६ या कालावधीत ई ठिंबक आज्ञावली सुरु होती. याशिवाय, या कालावधीत उद्विष्ट पूर्ण न झालेल्या ८ जिल्हयाकरीता ऑनलाईन अर्ज स्वीकारण्यासाठी दि.१४ ऑक्टोबर, २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आली होती.

(२) व (३) नाही. दि.१०.९.२०१६ ते १४.९.२०१६ या कालावधीत तांत्रिक दोष निर्माण झाल्यामुळे ऑनलाईन प्रणाली बंद ठेवण्यात आली होती. सर्व तांत्रिक दोष पुर्ण करुन दि.१४.१०.२०१६ पासून पुन्हा सुरु करण्यात आली. कोल्हापूर जिल्हयात सन २०१६-१७ या वर्षासाठी एकूण ६५५५ शेतकऱ्यांचे अर्ज प्राप्त झाले आहेत. कोल्हापूर जिल्हयात प्राप्त अर्जाची संख्या त्या जिल्हयासाठी ठरवून दिलेल्या उद्विष्टांपेक्षा जास्त आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परांडा-भूम-वाशी (जि.उस्मानाबाद) मतदार संघातील सुक्ष्म सिंचन योजनेच्या लाभार्थ्यांना अनुदान मिळाले नसल्याबाबत**

**(२५) ६६८०२ (१६-१२-२०१६). श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्हयातील परांडा-भूम-वाशी विधानसभा मतदार संघातील प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेअंतर्गत सुरु करण्यात आलेल्या सुक्ष्म सिंचन योजनेच्या लाभार्थ्यांचे अनुदान गत एक वर्षापासून देण्यात आलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर योजनेचे अनुदान लाभार्थी शेतक-यांना त्वरित वितरित करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदरहू योजना कार्यान्वीत करण्याबाबत तसेच योजनेचे अनुदान लाभार्थी शेतक-यांना त्वरित वितरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (०९-०६-२०१७)** :(१), (२) व (३) लोकप्रतिनिधींचे दिनांक १८ ऑक्टोबर, २०१६ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

उस्मानाबाद जिल्हयांतील परांडा, भुम व वाशी या तालुक्यांसाठी सन २०१५-१६ या वर्षात रु.१८०.२४ लक्ष एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. उपलब्ध निधीच्या मर्यादेत प्राप्त अर्ज ११७९ पैकी ६६२ अर्जांना प्राथम्य क्रमानुसार पूर्वसंमती देण्यात आली. सदर अर्जदारांनी सुक्ष्म सिंचन संचाची उभारणी केल्यानंतर अनुदानाची रक्कम रु.१८०.२४ लक्ष त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात आली आहे.

पूर्वसंमती नसतांना परस्पर सुक्ष्म सिंचन बसविलेल्या लाभार्थ्यांना अनुदान अनुज्ञेय नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हवेली (जि.पुणे) दुय्यम निबंधक क्र.१ या कार्यालयाची झालेली दुरवस्था**

**(२६) ६७३०९ (१६-१२-२०१६). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला), श्रीमती मेधा कुलकर्णी (कोथरुड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हवेली (जि.पुणे) दुय्यम निबंधक क्र.१ या कार्यालयाची दुरवस्था झाली असून कार्यालय इतरही अनेक समस्यांनी ग्रासले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू ठिकाणी महत्वाचे दस्तऐवज असलेले रेकॉर्ड रूम मधील कर्मचाऱ्यांची अरेरावी व कार्यालयाच्या प्रचंड दुरवस्थामुळे तेथे येणाऱ्या नागरिकांमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कार्यालयात जुन्या दस्ताची नक्कल मिळवण्यासाठी अनेक ज्येष्ठ नागरिकांना वारंवार फेऱ्या माराव्या लागत असून त्यांचे अर्ज बऱ्याच महिन्यापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१६-०६-२०१७) :**(१) अशी बाब निदर्शनास आली नाही.
(२) व (३) दुय्यम निबंधक कार्यालय, हवेली क्र.१ येथे दैनंदिन दस्त नोंदणीच्या कामकाजा बरोबरच जुने अभिलेख देखील जतन करण्याचे कामकाज असल्याने सामान्य जनतेकडून मुळ दस्त, प्रमाणित प्रती व इंडेक्स II ची मोठ्या प्रमाणात दररोज मागणी होत असते. त्यामुळे अभिलेखांच्या उपलब्धतेनुसार पक्षकारांना तात्काळ देण्यात येतात.
(४) सन १९८५-२००२ या कालावधीत छापील व फोटो या पध्दतीने दस्त नोंदणीस स्विकारलेले आहेत. त्यातील नोंदणी पूर्ण झालेल्या फोटो पध्दतीखालील दस्तांचे स्कॅन केलेले आहेत. मात्र छापील पध्दतीखालील नोंदणी पूर्ण झालेले दस्त स्कॅन झालेले नाहीत, असे दस्त स्कॅन करण्यासाठी निविदा मागवून निवड झालेल्या पात्र संस्थेकडून हे काम करुन घेण्याची निवड प्रक्रिया सुरु करण्यात आलेली आहे. नोंदणी पूर्ण झालेल्या छापील दस्तांचे स्कॅनिंग करुन त्याचा सॉफ्ट डाटा एकत्रितपणे या विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर ई-सर्च या सदराखाली जनतेस शोधासाठी उपलब्ध करुन देण्याचे संकल्पित आहे. त्याद्वारे गरजेनुसार त्यांच्या नकला डाउनलोड करुन घेण्याची सुविधा सुध्दा उपलब्ध करुन देण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्ह्यामध्ये ऑनलाईन प्रणालीच्या त्रुटी दुर होईपर्यत हस्तलिखित सातबारा वापरण्यास परवानगी देण्याबाबत**

**(२७) ६७७९६ (१६-१२-२०१६). श्री.चंद्रदीप नरके (करवीर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयामध्ये ६ लाख ३१ हजार जमीनधारक खातेदारांची संख्या असून जिल्ह्यामध्ये ४५३ तलाठयांकडून प्रत्यक्ष गाववार महसूलाचे काम केले जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०११ मध्ये कोल्हापूर महसूल विभागाने ऑनलाईन सात बारा व दस्त नोंदीकरीता स्वतंत्र सॉफ्टवेअर तयार केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर सॉफ्टवेअर यंत्रणा व्यवस्थित चालत नसल्याने ऑनलाईन हक्क सोडपत्राचा तपशिल तयार होत नाही त्यामुळे सातबारावर कुपनलिका, विहीरी नोंदी करताना गोंधळ निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, ऑनलाईन प्रणालीच्या त्रुटी दूर होईपर्यंत हस्तलिखित सात बारा काढण्यास व वापरण्यास परवानगी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१२-०६-२०१७) :**(१), (२), (३), (४) व (५) कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ९,८७,१२८ खातेदार असून जिल्ह्यात एकूण ४४८ तलाठ्यांकडून सदर महसूलाचे काम केले जात आहे.

सन २०११ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यातील सर्व १२ तालुक्यांमध्ये एका यंत्रणेने विकसीत केलेल्या आज्ञावलीमधून गा.न.नं.७/१२ ची नोंद सॉफ्टवेअरमध्ये ऑफलाईन केली जात होती व फेरफाराच्या नोंदी हस्तलिखित केल्या जात होत्या. तसेच फेरफाराचे अद्यावतीकरण सेतू केंद्रामार्फत केले जावून गा.न.नं.७/१२ ला सदर फेरफाराचा अंमल घेतला जात होता.

अधिकार अभिलेखातील फेरफार मंजूर करण्याच्या कार्यपध्दतीचे पूर्णत: संगणकीकरण करुन “ई-फेरफार” प्रणालीतून ऑनलाईन म्युटेशन कार्यक्रम संपूर्ण राज्यात सुरु करण्याचा निर्णय शासनाने दि.२३.०१.२०१३ रोजी घेतला आहे. त्यानुसार संपुर्ण राज्यात संगणकीकृत गा.न.नं.७/१२ उतारा देण्यासाठी व ‘ई-फेरफार’ नोंदी घेण्यासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र, पुणे यांच्याकडून स्वतंत्र आज्ञावली विकसीत करण्यात आली असून सदर आज्ञावलीचा वापर कोल्हापूर जिल्ह्यात सुरू आहे. या आज्ञावलीद्वारे गा.न.नं.७/१२ चे संगणकीकरण व ऑनलाईन फेरफार घेण्याची कार्यवाही सुरू असून ज्या दस्त प्रकारचा तपशील ई-फेरफार आज्ञावलीमध्ये स्वयंचलीतरित्या तयार होत नाही (उदा.हक्कसोडपत्र) त्या दस्ताच्या सूची-२ वरून तलाठी अनोंदणीकृत पध्दतीने ऑनलाईन फेरफार घेत आहेत.

तसेच संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ वितरीत करण्यात काही ठिकाणी येत असलेल्या अडचणी विचारात घेता, “एडीट मोड्यूल” च्या माध्यमातून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ मध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या होईपर्यंत तसेच, जेथे तांत्रिक कारणांस्तव “ई-फेरफार” प्रणालीतून संगणकीकृत गा.न.नं. ७/१२ च्या उताऱ्यांचे प्रिंट आऊट काढून अर्जदारांस वितरीत करणे शक्य होत नसेल तेथे, एक विशेष बाब म्हणून, केवळ शेतकरी खातेदारांना कर्ज व अन्य शेती

विषयक प्रयोजनाकरीता तसेच थेट शासनासोबत जमिन विक्री व्यवहार करण्याच्या प्रयोजनाकरीता हस्तलिखित गा.न.नं. ७/१२ उतारे वितरीत करण्यास दि.३०.०४.२०१७ पर्यंत मुभा देण्यात आली आहे.

"ई-फेरफार" प्रणाली राबविण्यासंदर्भातील सर्व अडचणींवर मात करुन तीच्या प्रभावी अंमलबजावणी करीता शासन प्रयत्नशिल आहे.

---

**तिरोडा (जि.गोंदिया) येथील तहसील कार्यालयाची इमारत जीर्ण अवस्थेत असल्याबाबत**

**(२८) ६९५७१ (१६-१२-२०१६). श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिरोडा (जि.गोंदिया) येथील तहसील कार्यालयाच्या इमारतीची अत्यंत जीर्ण अवस्था झाली असल्याने इमारत कोसळून अपघात होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तहसील कार्यालय हे तालुक्यातील महत्वाचे कार्यालय असल्याने नागरिकांच्या सुविधे करिता जीर्ण झालेल्या इमारतीच्या बदली प्रशासकीय इमारत शासनामार्फत बांधण्यात येणार आहे काय,

(३) असल्यास, सदर इमारती धोकादायक झाली असल्याने नवीन इमारत बांधण्यासाठी स्थानिक लोकप्रतीनिधिंनी दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजीच्या पत्रान्वये मा. महसूल मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने जीर्ण झालेली तहसील कार्यालयाच्या इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत व नवीन प्रशासकीय इमारत बाधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७) :**(१) तिरोडा जिल्हा गोंदिया येथील तहसील कार्यालयाची इमारत सन १९८२-८३ मध्ये बांधण्यात आली आहे. सदर इमारतीला काही ठिकाणी भेगा पडलेल्या आहेत.

(२) तहसील कार्यालय व उप विभागीय अधिकारी (राजस्व) यांच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचे प्राथमिक अंदाजपत्रक कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, गोंदिया यांचेकडून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे प्राप्त झाले आहे.

(३) होय, हे खरे आहे.

(४), (५) व (६) तिरोडा येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाच्या प्राथमिक अंदाजपत्रकावर जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्या कार्यालयात कार्यवाही सुरु आहे.

---

**उदगीर (ता.उदगीर, जि.लातूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयाची नवीन इमारत बाधण्याबाबत**

**(२९) ७१६६४ (१६-१२-२०१६). श्री.सुधाकर भालेराव (उदगीर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उदगीर (ता.उदगीर,जि.लातूर) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाची स्वतंत्र इमारत नसून ते तात्पुरत्या स्वरुपात लातूर येथे कार्यान्वयीत करण्यात आले आहे या कार्यालयात विविध साई सुविधा उपलब्ध होत नसल्यामुळे व सदर इमारत खाजगी भाडे तत्वावरील जागेत असल्यामुळे प्रशासनाची व नागरिकांची गैरसोय होत असल्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्वतंत्र इमारतीसाठी निधी उपलब्ध करुन देण्यासाठी सन २०१६ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, राज्य शासनाने उदगीर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाची स्वतंत्र इमारत बांधण्यासाठी १० कोटी रुपयाचा निधी मंजूर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, नवीन जळकोट (जि.लातूर) तालुक्यात मागील १५ वर्षा पूर्वी मंजूर झालेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाचे शासकीय विश्राम गृह अद्याप बांधण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सार्वजनिक बांधकाम विभागाची उदगीर येथे इमारत व शासकीय विश्राम गृह बांधण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही. सार्वजनिक बांधकाम खात्याचे विश्रामगृहाचे काम मंजूर नाही.

(४) सार्वजनिक बांधकाम विभागाची इमारत उदगीर येथे बांधणेबाबत माननीय आमदार महोदयांची मागणी होती. तथापि, दि.१७/०५/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्यालय लातूर येथे कार्यान्वित झालेले आहे. दि.१८/०९/२००२ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीतील चर्चेत नवीन विश्रामगृहे बांधण्यात येऊ नये अशाप्रकारच्या झालेल्या निर्णयानुसार, नवीन जळकोट येथील शासकीय विश्रामगृहाचे बांधकाम अद्याप हाती घेण्यात आले नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये व निवासस्थाने बांधण्याबाबत**

**(३०) ७१९२६ (१६-१२-२०१६). श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला (जि.नाशिक) तालुक्यातील ३० गावांमध्ये तसेच निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये व निवासस्थाने बांधण्याच्या अंदाजपत्रकांना प्रशासकीय मान्यता मिळण्यासाठी दिनांक २८ मार्च, २०१६ व दिनांक ८ ऑगस्ट, २०१६ रोजी विभागीय आयुक्त नाशिक यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील कार्यालये-निवासस्थाने बांधण्याकरिता आवश्यक निधी व प्रशासकीय मान्यता मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनामार्फत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७)** :(१) व (२) होय खरे आहे.
(३), (४) व (५) येवला तालुका जि.नाशिक मधील ३० गावांमध्ये तसेच निफाड तालुका जि.नाशिक यामधील १९ गावांमध्ये तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालये-एवं-निवासस्थाने बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्याच्या विभागीय आयुक्त, नाशिक यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची छाननी करण्यात आली आहे. याबाबत काही मुद्यांची माहिती विभागीय आयुक्त नाशिक विभाग, नाशिक यांच्या कार्यालयाकडून मागविण्यात आली आहे.

---

## नांदेड शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वस्तीगृहाच्या इमारतीला तडे गेल्याबाबत

**(३१) ७२१५८ (१६-१२-२०१६). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी बांधण्यात आलेल्या वस्तीगृह इमारतीला तडे जाऊन एका वर्षात या इमारतीस गळती लागल्याचे माहे जून, २०१६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन कोटी रुपये खर्च करुन उभारण्यात आलेल्या या इमारतीचे काम कंत्राटदार व अभियंत्याद्वारे निकृष्ट दर्जाचे झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू निकृष्ट काम करणाऱ्या कंत्राटदार व अभियंत्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७)** :(१) अंशत: खरे आहे. निधी अभावी गळतीप्रतिबंधक उपाययोजनेचे काम करणे शक्य न झाल्याने काही ठिकाणी छतामधून पाण्याची गळती झाली होती.

(२) हे खरे नाही.
(३) सदर कामास निधी उपलब्ध झाल्यानंतर छतावरील गळती प्रतिबंधक उपाययोजना करण्यात आली असून गळती पूर्णपणे बंद आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गालगतच्या शेकडो हेक्टर जमिनीची अवैध खरेदी**

**(३२) ७४१८९ (१२-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर-मुंबई समृध्दी महामार्गालगतची शेकडो हेक्टर जमिन राज्याचे माजी मुख्य सचिव अरुण बोंगीरवार व त्यांचा मुलगा पीयुष, जे.पी.डांगे व त्यांचा मुलगा नरेंद्र, ठाण्याचे प्रांताधिकारी सुदाम परदेशी यांचा भाऊ सुभाष, ठाण्याचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद चव्हाण यांचा भाऊ सुनिल चव्हाण, तत्कालिन अतिरिक्त जिल्हाधिकारी कैलास जाधव यांचा भाऊ सुभाष इ. अनेक आजी-माजी अधिकाऱ्यांनी त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या नावे पदाचा गैरवापर करून खरेदी करुन शेतकऱ्यांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची लेखी तक्रार श्री.बबन हरणे, समन्वयक शेतकरी संघर्ष समिती यांनी यापूर्वीच शासनाकडे केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने काही विधानसभा सदस्यांनी विविध ठिकाणच्या जमिनीचे ७/१२ विधिमंडळाच्या सभागृहात मांडून ज्यांनी जमिनी घेतल्या त्यांचेविरुध्द कारवाई करण्याची मागणी केल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,
(५) असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार नागपूर मुंबई समृध्दी महामार्गालगतच्या जमीनी खरेदी करणाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७) :**(१), (२), (३), (४),(५) व (६) याबाबत माहे डिसेंबर, २०१६ मध्ये काही वर्तमानपत्रात बातम्या प्रसिध्द झालेल्या होत्या. तसेच सन २०१६ च्या हिवाळी अधिवेशनात दि.१५ डिसेंबर, २०१६ रोजी विधानसभेत सन्माननिय सदस्यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम ९७ अन्वये स्थगन प्रस्तावाची सूचना मांडली होती. सदर स्थगन प्रस्तावाच्या सूचनेत सन्माननिय सदस्यांनी मांडलेल्या मुद्याच्या अनुषंगाने चौकशी केली जाईल असे आश्वासन मा.मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहास दिले आहे. सदर आश्वासनाच्या

अनुषंगाने, तसेच माहे डिसेंबर, २०१६ मध्ये या संदर्भात विविध वर्तमानपत्रातील बातम्यात उपस्थित केलेल्या बाबींची शहानिशा करुन वस्तुनिष्ठ अहवाल सादर करण्यास सर्व संबंधित विभागीय आयुक्तांना शासनाने कळविले असून सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर उचित कार्यवाही करण्याचे संकल्पित आहे.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा-आरोसबाग, शेर्ले-बांदा या गावांतील पूल बांधण्याबाबत**

**(३३) ७४३४९ (१२-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्हयातील बांदा-आरोसबाग, शेर्ले-बांदा या गावांतील ग्रामस्थांना दळणवळणासाठी आवश्यक असलेल्या पूलास नाबार्ड-२१ मधून मंजूरी मिळाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व तांत्रिक मंजूरी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर पूलासाठी किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व किती कालावधीत सदर पुलाचे बांधकाम पूर्ण करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी मेरिटाईम बोर्डाने दिलेल्या बाबींची पुर्तता झाली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे

(३) प्रश्नांकित पूलासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरीता रु.२७६.०९ लक्ष इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. सदर काम निविदास्तरावर आहे.

(४) मेरीटाईम बोर्डाने दिलेल्या बाबींची पूर्तता पूलाचा रचना आराखडा तयार करताना करण्यात आली आहे.

---

**अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांच्या विरुद्ध कारवाई करण्याबाबत**

**(३४) ७४६३४ (१२-०४-२०१७). श्री.सरदार तारासिंह (मुलुंड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील नागरिकांच्या विविध तक्रारीनुसार मा.मंत्री, कौशल्यविकास, उद्योजकता व कामगार यांनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे श्री.श्रीनिवास कातकडे, अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांनी कार्यालयीन कामकाजात मोठया

प्रमाणात आर्थिक व प्रशासकीय गैरव्यवहार करुन शासकीय अधिकाराचा गैरवापर केल्याबाबत कारवाई करण्याची पत्राद्वारे मागणी केल्याचे दिनांक २० जानेवारी, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मंत्री महोदयांनी श्री.श्रीनिवास कातकडे, अधीक्षक अभियंता, सा.बां.विभाग, उस्मानाबाद यांच्या आर्थिक व प्रशासकीय गैरकारभार व शासकीय अधिकाराचा गैरवापर याबाबत केलेल्या नेमक्या तक्रारी कोणत्या आहेत,
(३) असल्यास, उक्त सर्व तक्रारींची शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्यानुसार संबंधिता विरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) :**(१) अशा आशयाची तक्रार शासनास प्राप्त झाली आहे.
(२) प्राप्त तक्रारीतील मुद्दे प्रामुख्याने खालीलप्रमाणे आहेत :-

अ) सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये वरिष्ठ कार्यालयाच्या अधिकारात असलेल्या अंदाजपत्रकाच्या किंमती कमी करुन (जवळपास ३० ते ४०%) स्वत:च्या अधिकारात तांत्रिक मान्यता देणे, तसेच ठेकेदारांशी संगनमत करुन त्याच कामावर आवश्यकता नसतांना प्रशासकीय मान्यता आवाकाच्या बाहेर जाऊन स्वत:ची निरिक्षण टिपणी निर्गमित करणे,

ब) लातूर येथील सी. आर. एफ. अंतर्गत मंजूर लातूर-बार्शी रस्त्यांचे काम व बीड जिल्ह्यातील काही कामांसाठी वारंवार फेर निविदा काढून, मर्जीतल्या कंत्राटदाराच्या कागदपत्राप्रमाणे अर्थ लावणे व निविदा नियमावली डावलून मर्जीतील कंत्राटदारास काम बहाल करणे,

क) लातूर जिल्ह्यातील घरणी नदीवरील मोठ्या पुलांच्या बांधकामाची निविदा सन २०१२-१३ मध्ये स्वीकृत होऊन, ठेकेदाराने निविदा शर्थीचे पालन करुनही ठेकेदारास कार्यारंभ आदेश स्वत:च्या लाभासाठी न दिल्याने आजतागायत काम सुरु झालेले नसणे, यामूळे सदरील कामांच्या किंमतीत वाढ होणे,

ड) शासनाकडून संगणक प्रणालीव्दारे निधी वितरित होऊन देखील स्वत:च्या आर्थिक लाभासाठी ठेकेदारास बोलावून टप्प्याटप्प्याने निधी स्वत:च्या सोईनुसार वितरीत करणे.
(३) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांचेमार्फत सदर तक्रारीची सखोल चौकशी करण्यात येत आहे.
(४) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, पुणे यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त झालेनंतर त्यातील निष्कर्षानुसार आवश्यकतेप्रमाणे शिस्तभंगविषयक पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### कोल्हापूर जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागातील रिक्त पदांबाबत

**(३५) ७४७८८ (१२-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील भूमी अभिलेख विभागातील चौदा कार्यालयांसाठी केवळ आठ उपअधिक्षक कार्यरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपअधिक्षक नसल्यामुळे अन्य तालुक्यांच्या कार्यालयातील कामकाज अत्यंत धिम्या गतीने चालू आहे त्यामुळे तेथील नागरिकांची प्रॉपर्टी कार्डासह अनेक कामे रखडली असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कार्यालयातील रिक्त जागा तातडीने भरण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७) :**(१) व (२) कोल्हापूर जिल्ह्यात उप अधिक्षक भूमी अभिलेख या गट "ब" संवर्गात १४ पदे मंजूर असून सद्यस्थितीत ८ अधिकारी कार्यरत आहेत. रिक्त पदे असलेल्या तालुक्यातील नागरिकांच्या कामाची अडचण होवू नये म्हणून सदरचा पदभार अन्य तालुक्यातील अधिकारी यांचेकडे अतिरिक्त कार्यभार म्हणून सोपविणेत आलेला आहे.

(३) व (४) उप अधिक्षक भूमि अभिलेख, गट-"ब" या संवर्गाच्या पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवर पदोन्नती मिळण्यास पात्र उमेदवारांना पदोन्नती देण्याची कार्यवाही सुरु असून त्याद्वारे उपलब्ध होणाऱ्या उमेदवारांना नियुक्त्या देताना याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

## जुन्नर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्याला जोडणारा पूल बांधण्याबाबत

**(३६) ७५३८५ (१२-०४-२०१७). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जुन्नर व आंबेगाव (जि.पुणे) तालुक्याला जोडणाऱ्या मीना नदीवर मौजे खोडद, आर्वी, पिंपळगाव-वणीमळा, शिरोली खुद्र ते शिरोली बुद्रुक तेजेवाडी येथे पूल बांधणे व चिंचोली-पारूंडे-काटेडे-येणेरे मार्गे इंगळून रस्त्यांचे डांबरीकरण करणे तसेच कावळ पिंपरी-निमगाव सावा कारखानामार्गे येडगाव-जुन्नर रस्त्यांचे डांबरीकरण करणे इत्यादी मागण्याचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ मे, २०१६ रोजी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१३-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) (i) जुन्नर आंबेगाव तालुक्याला जोडणाऱ्या मीना नदीवरील मौजे खोडद येथे पुलाच्या बांधकामास नाबार्ड -२२ अंतर्गत मंजूरी प्राप्त झाली असून सदर कामासाठीचे अंदाजपत्रक सादर करण्यात येईल

(ii) मौजे आर्वी पिंपळगाव वाणीमळा, शिरोली खुर्द ते शिरोली बु.तेजेवाडी येथे पुल बांधणे या पुलांची कामे अर्थसंकल्पात निधी, निकष व अग्रक्रम यास अधीन राहून प्रस्तावित करण्याचा प्रयत्न राहील.

(iii) चिंचोली पारुंडे काटेडे येणेरे मार्ग इंगळून रस्त्याचे डांबरीकरण करणे या लांबीतील मौजे इंगळून ते बेलसर किमी १५/०० ते २३/९०० रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अर्थसंकल्प माहे जुलै, २०१६ अंतर्गत मंजूर अूसन सदयस्थितीत हे काम निविदा स्तरावर आहे.

(iv) कावळ पिंपरी निमगाव सावा या कामास प्रशासकीय मान्यता असून सदरचे काम अंदाजपत्रकीय स्तरावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आंधळगाव मोहाडी बायपास रस्ता बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(३७) ७५४४२ (१२-०४-२०१७). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवनिर्मित मोहाडी नगरपंचायतीच्या (ता.मोहाडी, जि.भंडारा) मुख्य वस्तीमधून भंडारा रामटेक राज्यमार्ग जात असून नगरपंचायतीची वाढती लोकसंख्या व वाहनामुळे सदर मार्गावर नेहमीच वाहतुकीची कोंडी व अपघात होतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मार्गाला पर्यायी ठरणाऱ्या मोहाडी आंधळगाव वळण मार्गासाठी निधी मंजूर होणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम यांच्याकडे दिनांक ०३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार सा.बां.विभागाने सदर वळण रस्त्याच्या भूसंपादनाकरिता निधीची मागणी शासनाकडे माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त वळण रस्त्याकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७) :**(१) व (२) होय

(३), (४) व (५) जांब आंधळगाव मोहाडी रोहा मुंढरी राज्यमार्ग क्र.३६१ या रस्त्याचे सुधारणा करण्याचे काम Annuity अंतर्गत मंजूर असून Annuity अंतर्गत निवडण्यात आलेल्या रस्त्यांची सुधारणा करताना शहर/ गावाभोवती वळणमार्ग प्रस्तावित न करता उपलब्ध जागेतच ROW मध्ये रस्ता सुधारण्याचे काम करणेबाबत दि.३.५.२०१७ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

---

**वानिवडे सरवणकरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूपप्रतिबंधक बंधारा बांधण्याबाबत**

**(३८) ७५९८३ (१२-०४-२०१७). श्री.नितेश राणे (कणकवली), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वानिवडे सरवणकरवाडी (ता.देवगड, जि.सिंधुदुर्ग) येथे धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या अंदाजीत रुपये १ कोटी खर्चापैकी सन २०१६-२०१७ च्या अर्थसंकल्पात २१ लाख, ७४ हजाराची तरतूद केलेली असतानाही अद्यापपावेतो सदरहू बंधाऱ्याच्या कामास सुरूवात करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धूपप्रतिबंधक बंधाऱ्याच्या कामास सुरूवात न होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, सदरहू धूपप्रतिबंधक बंधाऱ्याचे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०३-०६-२०१७) :**(१) होय.

(२) सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून पर्यावरण विभागाची परवानगी प्राप्त न झाल्यामुळे सदर कामास सुरुवात झालेली नाही.

(३) सदर कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पर्यावरण विभागाची परवानगी प्राप्त करण्यासाठी दि.२३.३.२०१७ रोजी प्रस्ताव पर्यावरण विभागास सादर करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्ते राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५५ ला जोडण्याबाबत**

**(३९) ७६८५७ (१२-०४-२०१७). श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य महामार्ग क्रमांक ५५ हा महामार्ग राष्ट्रीय महामार्ग म्हणून घोषित केला असून श्रीगोंदा (जि.अहमदनगर) तालुक्यातील रस्ते महामार्गाला जोडण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१७ च्या पहिल्या सप्ताहात घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०१-०६-२०१७)** :(१) व (२) केंद्र शासनाच्या दि.३.१.२०१७ च्या अधिसूचनेनुसार राज्यमार्ग-५५ हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८-ड म्हणून घोषित करण्यात आलेला आहे. सद्य:स्थितीत अस्तित्वातील राज्यमार्ग-५५ या रस्त्याला श्रीगोंदा तालुक्यातील अस्तित्वातील राज्यमार्ग क्र.६०, ६७, प्रमुख जिल्हा मार्ग क्र. ५९, ६२, ६३, ६५, इतर जिल्हा मार्ग क्र.१३९,१४०,१३७, १३५, १३८ व ग्रामीण मार्ग क्र.६४, ६३, ८३, ३३, १६२, ३४, १४२, १३६, २९३, २, १५८, १९०, ९९, १८७, ३२२, ३५, ३१८, १८८ हे रस्ते जोडलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### तिवसा, (जि. अमरावती) येथील शासकीय विश्रामगृहासाठी निधी मंजूर करणेबाबत

**(४०) ७७०५२ (१२-०४-२०१७). अॅड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) येथील शासकीय विश्रामगृहामध्ये अतिरिक्त सुटचे बांधकाम करण्यासाठी व विश्रामगृहाची सुधारणा करण्याकरिता रुपये २.०० कोटी निधी मंजूर करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम विभाग यांना दिनांक ५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त सूटच्या बांधकामाकरिता निधी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०५-०६-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) सदर कामाचे अंदाजपत्रक या विभागास प्राप्त असून अंदाजपत्रकाची छाननी शासनस्तरावर प्रगतीपथात आहे.
(३) तिवसा येथील महत्वाच्या शासकीय विश्रामगृहाच्या अतिरिक्त सूटचे बांधकाम व विश्रामगृहाची सुधारणा करण्याकरिता मागणी करण्यात आलेला निधी उपलब्धतेनुसार प्राधान्यक्रमाने हाती घेण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मीरा-भाईंदर परिसरात खाडी किनारी असलेल्या आगरी आणि कोळी समाजाच्या वस्तीतील नागरिकांना खोट्या नोटीसा पाठविल्याबाबत

**(४१) ७७९६३ (१२-०४-२०१७). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर परिसरात खाडी किनारी असलेल्या आगरी आणि कोळी समाजाच्या वस्ती जवळील तिवरांचे जंगल तोडणे व मातीचा भराव टाकने या कारणास्तव ग्रामस्थांवर महसूल विभागाने कारवाईच्या नोटीसा दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी ग्रामस्थांनी सदर नोटीसा खोट्या असून त्यांनी सदर नोटीसाच्या विरोधात आंदोलन करण्याचा इशारा महसूल विभाग व तहसिलदार यांना लेखी निवेदनाव्दारे दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त वसाहतीतील रहिवाश्यांवर खोट्या नोटीसा बजावण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर खोट्या नोटीसा पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१४-०६-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) उक्त नोटीसीच्या अनुषंगाने ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. तथापि, उक्त वसाहतीतील रहिवाश्यांना खोट्या नोटीसा बजावलेल्या नाहीत. सदर नोटीसा मा.उच्च न्यायालयाचे रिट याचिका क्र.३२४६/२००४ (रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६) मधील दि.६/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन काढणेत आलेल्या आहेत.

---

## पंढरपूर (जि.सोलापूर) येथे येणाऱ्या पालखी महामार्गावरील पुल बांधण्याबाबत

**(४२) ७८२७१ (१२-०४-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) विदर्भ तसेच मराठवाडा येथून पंढरपूर येथे येणाऱ्या पालखी मार्गावरील सोलापूर जिल्ह्यातील खैराव कुंभेज रस्त्यावरील पुल बांधण्याच्या कामाचा नाबार्ड अंतर्गत समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे दिनांक २८ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पुल नसल्यामुळे पंढरपूर वारीच्या वेळेस वारकऱ्यांना नदीपात्रातून जावे लागते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१७) :**(१) व (२) होय
(३) व (४) विषयांकित पूलाचे काम नाबार्ड मध्ये प्रस्तावित करण्यात आले असून मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

### कोल्हापूर जिल्हयातील विविध पूलांना मोबाईल कंपन्याच्या केबलचा विळखा पडल्याबाबत

**(४३) ७८५२६ (१२-०४-२०१७). श्री.राजेश क्षीरसागर (कोल्हापूर उत्तर), श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील शिवाजी पूलासह विविध पूलांना विविध मोबाईल कंपन्याच्या केबलचा विळखा पडला असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कंपन्यांच्या केबलच्या विळख्यामुळे अपघात होण्याचा धोका निर्माण झाला असून याकडे सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी सदर पुलांची शासनाने पाहणी केली आहे काय,

(४) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व पाहणीनुसार सदर पुलांवरून केबलचा विळखा हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०१-०६-२०१७) :**(१) हे खरे नाही.

काही पुलांच्या बाबतीत पुलांच्या कर्ब वरून/बाजूने ओ.एफ.सी. केबल टाकण्यात आलेली आहे. परंतु त्यामुळे पुलाला केबलचा विळखा पडलेला नाही. यास्तव वाहतुकीस धोका किंवा अपघात होण्याचा संभव नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

### चंदगड शहराला (जि.कोल्हापूर) बाह्यवळण रस्ता बांधण्याबाबत

**(४४) ७८६८३ (१२-०४-२०१७). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंदगड (जि.कोल्हापूर) शहराला बाह्यवळण (बायपास) रस्ता बांधण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कोल्हापूर जिल्हयातील आजरा-महागाव रस्त्याचे रुंदीकरण करण्याची बाबही शासनाच्या विचाराधीन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रश्न भाग १ व २ च्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) असल्यास, निर्णयाचे स्वरूप काय आहे व त्या अनुषंगाने चंदगड शहराला बाह्यवळण (बायपास) रस्ता बांधण्याबाबत व आजरा-महागाव रस्त्याचे रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (२९-०५-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे
(२) होय, हे खरे आहे
(३), (४) व (५) चंदगड वळण रस्त्याचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्त्याच्या १ कि.मी. लांबीपैकी ०.५२० मी. लांबीचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित ०.४८० कि.मी. लांबीत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्या मालकीची इमारत येत आहे. सदर इमारत जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्यामार्फत पाडण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. इमारत पाडल्यानंतर उर्वरित काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. आजरा-महागाव रस्त्याच्या रुंदीकरणाचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राथम्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

## मिऱ्या (रत्नागिरी) ते नागपूर महामार्गाच्या चौपदरीकरणाबाबत

**(४५) ७८७६८ (१२-०४-२०१७). श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिऱ्या (रत्नागिरी) ते नागपूर महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या प्रस्तावास मंजुरी मिळाली असून महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला लवकरच सुरुवात होणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामार्गाच्या चौपदरीकरणासाठी जमीन संपादनाच्या कामाला सुरुवात केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकल्पात बाधीत होणा-या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत व त्यांना त्यांच्या जमिनीचा योग्य तो मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०६-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) होय.
(३) नागपूर - तुळजापूर- रत्नागिरी हे अंतर ९४१ कि.मी. आहे. त्यामध्ये तीन राष्ट्रीय महामार्ग समाविष्ट असून त्याची सदयस्थिती खालीलप्रमाणे आहे.
• नागपूर (बुट्टीबोरी) ते तुळजापूर हया ५२५.०० कि.मी. राष्ट्रीय महामार्ग क्र.१६६ च्या चौपदरीकरणाच्या कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास (DPR's) केंद्रीय रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाच्या अधिनस्त असलेल्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणास ८ भागामध्ये मंजूरी प्राप्त असून त्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीत आहे.

• राष्ट्रीय महामार्ग क्र.५२ (जुना २११) च्या तुळजापूर ते सोलापूर ह्या ४७.०० कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे.
• राष्ट्रीय महामार्ग क्र. १६६ च्या सोलापूर ते रत्नागिरी ह्या ३६९ कि.मी. महामार्गापैकी सोलापूर ते सांगली व कोल्हापूर ते रत्नागिरी या भागाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता प्राप्त असून ह्या भागांच्या चौपदरीकरणासाठी भूसंपादनाची कार्यवाही भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत आहे. उर्वरीत सांगली ते कोल्हापूर ह्या ६२ कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे राज्य शासनामार्फत खाजगीकरणामधून हाती घेतलेले काम ७० टक्के पूर्ण झाले असून हा भाग सुध्दा भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्याचे निर्देश मा.कैंद्रिय मंत्री, रस्ते वाहतुक व महामार्ग यांनी दिले असुन कार्यवाही प्रगतीत आहे.

ह्या सर्व प्रकल्पांसाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम १९५६ नुसार भूसंपादन करण्यात येणार असून RFCTLARR Act २०१३ मधील तरतुदीनुसार मोबदला देण्यात येणार आहे, असे संबंधीत प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे गार ते दौंड शहर (ता.दौंड, जि.पुणे) या दरम्यान भीमा नदीवर उड्डाण पूल बांधणेबाबत**

**(४६) ७९६३६ (१२-०४-२०१७). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.महेश (दादा) लांडगे (भोसरी), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे गार (ता.दौंड, जि.पुणे) येथील व परिसरातील नागरिकांना शेजारील शिरूर तालुक्यात व त्यालगतच्या गावामध्ये जाण्यासाठी दूरच्या अंतरावरून जावे लागत असल्यामुळे मौजे गार ते दौंड शहर या दरम्यान भीमा नदीवर उड्डाणपूल बांधणेबाबत स्थानिक लोकप्रतीनिधिनी माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केलेली मागणी अद्‌याप प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मौजे टाकळीभीमा ता. दौंड व टाकळी भीमा ता.शिरूर यांना जोडणाऱ्या मोठ्या पुलाचे काम सुरु करण्याबाबत शासनाने घोषीत केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त दोन्ही पुलांच्या बांधकामाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१७) :**(१) होय
(२) सन २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनातील विधान सभा तारांकित प्रश्न क्र.५२२७६ संदर्भात सभागृहात झालेल्या चर्चेच्या वेळी मा.मंत्री (सा.बां.) यांनी "एप्रिलमध्ये नाबार्ड अंतर्गत घेतल्या जाणा-या कामांमध्ये सदर पूलाचा प्राधान्याने समावेश केला जाणार आहे." असे सांगितले आहे.

(३) व (४) पुणे जिल्ह्यातील मौजे गार ते दौंड रस्त्यावरील भीमा नदीवर पूलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.
पुणे जिल्ह्यातील टाकळी भिमा येथील भिमा नदीवर पूल बांधण्याचे काम नाबार्ड अंतर्गत प्रस्तावित करण्यात आले आहे.

---

**नागभीड-ब्रहमपुरी (जि. चंद्रपूर ) या महामार्गाची दुरवस्था झाल्याबाबत**

**(४७) ७९८५४ (१२-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागभीड-ब्रहमपुरी (जि.चंद्रपूर) या महामार्गाची अत्यंत दुरवस्था झाल्याने वाहने चालविने अडचणीचे ठरून कोणत्याही क्षणी मोठा अपघात होऊन जीवीत व वित्त हानी होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर महामार्गाची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, पाहणीत काय आढळून आले व त्यानुसार उक्त महामार्गाची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०६-२०१७) :**(१) रस्त्याच्या पृष्ठभागावरील डांबरीकरणाचा थर निघाल्याने रस्त्याचा पृष्ठभाग काही भागात खडबडीत झाला आहे, हे खरे आहे.
(२) व (३) नागभिड-ब्रम्हपूरी-आरमोरी हया महामार्गाच्या दुपदरी काँक्रीट रस्त्याचे बांधकाम माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सुरु करण्यात आले असून माहे डिसेंबर, २०१८ मध्ये काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राष्ट्रीय महामार्ग क्र.६५ या महामार्गाची झालेली दुरवस्था**

**(४८) ८२५३८ (१२-०४-२०१७). श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय महमार्ग क्र. ९ (नवीन राष्ट्रीय महमार्ग क्र. ६५) वरील दस्तापूर ते महाराष्ट्र सिमेदरम्यानच्या रस्त्याची दुरवस्था झाल्याने या अंतरात सन २०१२ ते २०१६ या कालावधीत अपघातात १५० पेक्षा जास्त नागरिक मृत्युमुखी पडले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त महामार्गाची दुरवस्था झाल्यामुळे व चौपदरीकरणाच्या कामात सुरक्षा नियमांचा अवलंब होत नसल्याने सदर अपघात होत असून उक्त प्रकरणी जबाबदार असणाऱ्या सर्व संबंधितांवर कारवाई करण्याबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधी यांनी

जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांच्याकडे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाव्दारे मागणी करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर अपघातास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (०७-०६-२०१७) :**(१) हे खरे असल्याचे पोलीस अधिक्षक, उस्मानाबाद यांनी कळविले आहे.
(२) व (३) उक्त प्रकरणी जबाबदार असणा-या सर्व संबंधींतांवर कार्यवाही करणेबाबत उमरगा-लोहारा येथील लोकप्रतिनिधींनी मा.जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांचेकडे दिनांक ३० जानेवारी, २०१५ रोजी निवेदन दिलेले असल्याने जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी कळविले आहे. जिल्हा रस्ता सुरक्षा समिती, उस्मानाबाद अंतर्गत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने संबंधीत विभागातील अधिका-यांची राष्ट्रीय महामार्गावरील वाढत्या अपघातांसाठी व जिल्हयातील इतर ठिकाणी होणा-या अपघाताच्या वाढते प्रमाण कमी करण्याच्या हेतूने नियमित बैठक आयोजित करण्यात येते.राष्ट्रीय महामार्गावरील भुसंपादन विषयक कामे सुरळीत पार पाडण्यासाठी व कायदा सुव्यवस्थाविषयक परिस्थिती हाताळण्यासाठी उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली असून राष्ट्रीय महामार्गाच्या कामासंबंधी समस्येबाबत नियंत्रण ठेवले जाते. असे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी कळविले आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.९ (जुना) व नवीन ६५ या रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत (NHAI) प्रगतीपथावर आहेत. सदर चौपदरीकरणाच्या कामात उद्योजकाबरोबरील करारनाम्याच्या तरतुदीनुसार सुरक्षा नियमांचा अवलंब करणेबाबत उद्योजकास वेळोवेळी कळविण्यात आलेले असून त्याप्रमाणे उद्योजकाने सुरक्षा नियमांचा अवलंब करणेबाबत कार्यवाही केलेली आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील रस्त्याच्या कामाबाबत**

**(४९) ८४१७६ (१२-०४-२०१७). श्री.शिवाजीराव कर्डिले (राहुरी), श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे वालावल (ता.कुडाळ, जि.सिंधुदुर्ग) येथील पोस्ट कार्यालय ते नदीकिनारा या रस्त्याच्या खासदार फंडातून करण्यात आलेल्या खडीकरण व डांबरीकरणाच्या कामाची चौकशी करण्याचे आदेश कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग, सावंतवाडी यांनी उपविभागीय अधिकारी, मालवण यांना दिल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त आदेशानुसार सदर कामाची चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार दोषी असणाऱ्या कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०६-२०१७)** :(१) होय.
(२) होय.
(३) प्रश्नांकीत रस्त्याचे काम माहे डिसेंबर, २०१४ मध्ये पूर्ण झाले आहे. चौकशीच्या निष्कर्षानुसार रस्त्याचे काम योग्य दर्जाचे आहे. सदर रस्ता सुस्थितीत असून वाहतूक सुरळीत चालू आहे. त्यामुळे कंत्राटदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केत्तुर नं.२ ते पोमलवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर)**
**दरम्यान नवीन पुल उभारण्याबाबत**

**(५०) ८४४१९ (१२-०४-२०१७). श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील उजनी धरण पुर्ण क्षमतेने भरल्यामुळे केत्तुर नं.२ ते पोमलवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) दरम्यान स्थानिक ग्रामस्थांनी लोकसहभागातून केलेला भराव पाण्याखाली गेल्यामुळे दोन गावांचा संपर्क तुटला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर दोन्ही गावांतील नागरिकांच्या दळणवळणासाठी उक्त ठिकाणी नवीन पुल उभारण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील (१५-०५-२०१७)** :(१) होय.
(२) व (३) विषयांकित पूलाचे काम नाबार्ड मध्ये प्रस्तावित करण्यात आले असून मंजूरी व निधी उपलब्धततेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.